आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
४ एप्रिल २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- जगाच्या कल्याणासाठी बिमस्टेक हे उपयुक्त व्यासपीठ असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन, बिमस्टेक चेंबर ऑफ कॉमर्सच्या स्थापनेची घोषणा

- महाराष्ट्रासह तीन राज्यांमधल्या रेल्वे मंत्रालयाच्या सुमारे १८ हजार ६५८ कोटी रुपये खर्चाच्या ४ प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित

- डोनाल्ड ट्रम्प यांच्या शुल्कवाढ धोरणामुळे अमेरिका, युरोप, आशियातले शेअर बाजार कोसळले

- महाराष्ट्रातल्या नांदेड जिल्ह्यात आलेगाव इथं ट्रॅक्टर विहिरीत कोसळून ७ महिलांचा मृत्यू

**आणि**

- प्रख्यात चित्रपट अभिनेता आणि दिग्दर्शक निर्माता मनोज कुमार यांचं निधन

**<><><><><>**

जगाच्या कल्याणासाठी बिम्सटेक हे उपयुक्त व्यासपीठ असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. बँकॉक इथं सहाव्या बिम्सटेक संमेलनात आज ते बोलत होते. बिम्सटेक ही दक्षिण आणि आग्नेय आशियाई देशांची संघटना असून सदस्य देशांमधे सहकार्यासाठी २१ कलमी कार्यक्रम प्रधानमंत्र्यांनी प्रस्तावित केला.

बिम्सटेक चेंबर ऑफ कॉमर्सच्या स्थापनेची घोषणा करुन त्यांनी सांगितलं की त्याची व्यावसायिक बैठक दरवर्षी होईल. आपत्ती व्यवस्थापन, शाश्वत सागरी वाहतूक, पारंपरिक औषधं आणि कृषी संशोधन आणि प्रशिक्षण या विषयांवर

बिम्सटेक उत्कृष्टता केंद्र भारतात स्थापन करण्याची घोषणाही त्यांनी केली. त्यात बिम्सटेक देशातल्या ३०० तरुणांना कौशल्य विकासाची संधी देण्यासाठी बोधी या नवीन कार्यक्रमाची घोषणाही मोदी यांनी केली. या अंतर्गत व्यावसायिक, विद्यार्थी, संशोधक आणि राजनयिकांना प्रशिक्षण आणि शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल. बिम्सटेक परिषदेनिमित्त तिथं आलेले बांगलादेशाचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनुस यांच्याशी मोदी यांनी द्विपक्षीय चर्चा केली. दोन दिवसांच्या थायलंड दौऱ्यात प्रधानमंत्र्यांनी काल थायलंडच्या प्रधानमंत्री पेतोंगतार्न शिनावात्रा यांच्याशी उभयपक्षी हिताच्या मुद्द्यांवर चर्चा केली. थायलंडचा दौरा आटोपल्यानंतर प्रधानमंत्री मोदी श्रीलंकेला रवाना झाले आहेत.

<><><><><>

तीन दिवसांच्या परदेश दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात आज प्रधानमंत्री श्रीलंकेला पोहोचले. श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुरा कुमार दिसानायके यांच्या आमंत्रणावरुन मोदी तिथं जात असून सामायिक भविष्यासाठी समंजस भागीदारी या संकल्पनेवर आधारित ते द्विपक्षीय चर्चा करतील. आतापर्यंत उभय देशांच्या भागीदारीतून उभे राहणाऱ्या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावाही ते घेतील.

<><><><><>

रेल्वे मंत्रालयाच्या सुमारे १८ हजार ६५८ कोटी रुपये खर्चाच्या ४ प्रकल्पांना आज केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. महाराष्ट्र, ओदिशा आणि छत्तीसगढ या तीन राज्यातल्या मिळून १५ जिल्ह्यांमधून बाराशे सत्तेचाळीस किलोमीटर लांबीचे हे रेल्वे मार्ग जाणार आहेत. महाराष्ट्रातल्या गोंदिया – बल्लारशाह रेवेमार्गाचं दुपदरीकरण, तसंच गडचिरोली आणि मध्यप्रदेशातल्या राजनंदगाव या आकांक्षित जिल्ह्यांमधे मिळून १९ नवीन रेल्वे स्थानकांची उभारणी या कामांचा या प्रकल्पांमधे

समावेश आहे. या प्रकल्पांमुळे ३७९ लाख दिवस रोजगार मिळेल, असंही वैष्णव म्हणाले.

पूर्णपणे केंद्रपुरस्कृत व्हायब्रंट व्हिलेजेस कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यालाही केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. सरहद्दीजवळच्या दुर्गम भागतल्या खेड्यांमधे राहणाऱ्यांचं जीवनमान सुधारण्यासाठी हा कार्यक्रम राबवला जाणार आहे.

**<><><><><>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आज संस्थगित झालं. ३१ जानेवारी रोजी सुरू झालेल्या या अधिवेशनात ११८ टक्के काम झालं. लोकसभेत १६, तर राज्यसभेत १४ विधेयकं संमत झाली. या अधिवेशनात भरीव विधायक कामकाज झाल्याचं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं.

वक्फ सुधारणा विधेयकावर लोकसभेत १४ तास तर राज्यसभेत १७ तास चर्चा झाली, चर्चेदरम्यान एकदाही व्यत्यय आला नाही, असं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजीजू यांनी सांगितलं.

**<><><><><>**

वक्फ (सुधारणा) विधेयक, २०२५ काल राज्यसभेतही मंजूर झालं. संसदेनं मुस्लिम वक्फ रद्द करणे विधेयक, २०२५ लाही मान्यता दिली आहे. मुस्लीम राष्ट्रीय मंचाचे इरफान अली पीरजादे यांनी यासंदर्भात प्रतिक्रीया दिली….

**होल्ड - बाईट….**

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या भरमसाठ व्यापार टेरिफमुळे जागतिक मंदीच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर गुरूवारी अमेरिकी शेअर बाजार कोसळला. २०२० च्या कोविड साथीनंतर ही एका दिवसातली सगळ्यात मोठी घसरण ठरली. नॅसडॅक निर्देशांकामधे सहा टक्के घसरण झाली. या मंदीचे

पडसाद आशियातल्या प्रमुख शेअर बाजारात उमटले. जपान, कोरियाच्या शेअर बाजारात मोठी घसरण झाली. युरोपातल्या जर्मनी, फ्रान्स आणि लंडन बाजारांच्या निर्देशांकातही घट झाली. मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज ९३१ अंकाची घसरण झाली आणि तो ७५ हजार ३६५ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३४६ अंकांची घसरण नोंदवत २२ हजार ९०४ अंकांवर बंद झाला. जागतिक शेअर बाजारातल्या मंदीचे पडसाद आज देशातल्या शेअर बाजारात उमटले. धातू, भांडवली वस्तू, तेल आणि वायू तसंच औद्योगिक क्षेत्रातल्या कंपन्यांना या मंदीचा फटका बसला.

**<><><><><>**

चीननं आज अमेरिकी वस्तुंच्या आयातीवर ३४ टक्के अतिरिक्त शुल्क लादल्याची घोषणा केली. त्यामुळे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरु केलेलं व्यापारयुद्ध चिघळण्याची आणि मंदी येण्याची भीती वाढली आहे. या दोन आर्थिक महासत्तांमधली तेढ चीननं आणखी काही वस्तुंच्या निर्यातीवर निर्बंध जाहीर केल्यानं, तसंच जागतिक व्यापार संघटनेकडे तक्रार दाखल केल्यामुळे वाढली आहे. यावर्षाअखेरपर्यंत जागतिक अर्थव्यवस्था मंदीच्या खाईत सापडण्याची शक्यता ४० टक्के होती, ती आता ६० टक्क्यापर्यंत दिसू लागली असल्याचं जे पी मॉर्गननं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या नांदेड तालुक्यात आलेगाव इथं आज सकाळी मजुरांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर विहिरीत कोसळल्यानं ७ महिलांचा मृत्यू झाला. वसमत तालुक्यातल्या गुंज येथून या मजुरांना भुईमूग निंदणीसाठी घेऊन गेलेल्या ट्रॅक्टरच्या चालकाचा ताबा सुटल्यानं ट्रॅक्टर ट्रॉलीसह ते विहिरीत कोसळले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबियांप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून

मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदतही त्यांनी जाहीर केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनीही या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

<><><><><>

हिंदी चित्रपटसृष्टीतले ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते मनोज कुमार यांच्या निधनामुळे चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. मनोज कुमार यांचं आज सकाळी मुंबई इथल्या कोकिलाबेन अंबानी रुग्णालयात निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर उद्या सकाळी अकरा वाजता मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत.

मनोज कुमार यांचं मूळ नाव हरिकृष्ण गिरी गोस्वामी असं होतं. त्यांचा जन्म २४ जुलै १९३७ मध्ये तत्कालीन वायव्य सिंध प्रांतातल्या एबटाबाद इथं झाला होता. वो कौन थी, शहीद, हिमालय की गोद में, गुमनाम, पत्थर के सनम, नीलकमल, रोटी कपडा और मकान, क्रांती, पूरब और पश्चिम, उपकार हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत. देशभक्त नायक म्हणून त्यांनी साकारलेल्या रुपेरी पडद्यावरच्या व्यक्तिरेखांमुळे भारतकुमार हे टोपणनाव मिळालं. भारतीय चित्रपटसृष्टीतल्या त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना फिल्मफेअर पुरस्कार, दादासाहेब फाळके पुरस्कार आणि पद्मश्री सन्मानानं गौरवण्यात आलं होतं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मनोज कुमार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. मनोज कुमार यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर अमिट छाप सोडली आहे. त्यांच्या दीर्घ कारकिर्दीत त्यांनी देशभक्तीपर चित्रपट बनवून भारतीय मूल्यांविषयी अभिमानाची भावना जागृत केली, असं राष्ट्रपतींनी शोकसंदेशात म्हटलं आहे. तर, मनोज कुमार यांनी आपल्या अभिनय आणि चित्रपट

निर्मितीच्या माध्यमातून राष्ट्राभिमानाची भावना सदैव जागृत ठेवली, ही भावना पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देत राहिल, असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही मनोज कुमार यांच्या निधनाविषयी शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

ओदिशातल्या अब्दुल कलाम तळावरून आज भारतीय लष्कर आणि डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं मध्यम पल्ल्याच्या जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या लष्कराच्या क्षेपणास्त्रांच्या लागोपाठ चार चाचण्या घेतल्या. या चाचण्या यशस्वी झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं. या क्षेपणास्त्रांनी त्यांना दिलेलं हवाई लक्ष्य थेटपणे भेदलं, असंही मंत्रालयानं म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या चाचण्या यशस्वी झाल्याबद्दल अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

आकाशवाणीच्या माजी कार्यक्रम अधिकारी सुषमा हिप्पळगावकर यांचं काल मुंबईत निधन झालं. त्या ७३ वर्षांच्या होत्या. आकाशवाणी मुंबई केंद्रातून कार्यक्रम अधिकारी म्हणून त्यांनी २००६ मधे स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. आकाशवाणी मुंबई केंद्रात नभोनाट्य, वनिता मंडळ, साप्ताहिक स्वास्थ्य सेवा, आरोग्यम धनसंपदा, अशा विविध सदरांमधून त्यांनी सकस आणि दर्जेदार कार्यक्रम सादर केले आणि ते श्रोत्यांच्या पसंतीला उतरले.

**<><><><><>**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ इथं मुंबई इंडीयन्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना सुरु आहे.

मुंबई इंडीयन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा लखनौ सुपर जायंट्सच्या ९ व्या षटकात २ बाद - ९१ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//